लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. २९ जुलै २०१९

# सतीश उपळावीकर यांची निवड

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजचे सहायक प्राध्यापक सतीश उपळावीकर यांची नुकतीच हस्तकला कारागीर कामगार कल्याण संघाच्या सातारा जिल्हाध्यक्षपदी निवड झाली. त्यांना निवडीचे पत्र महाराष्ट्र राज्य बुरुड संघाचे उपाध्यक्ष जयवंत सोनवले यांच्या हस्ते दिले.

संघाच्या हस्तकला कारागीरांना योजनांबाबतची माहिती करुन देऊन न्याय मिळवून देण्यासाठी हस्तकला कारागीर व कामगार संघ कार्यरत राहणार आहे. राज्य अध्यक्ष दीपक यादव, नंदकुमार बेलवलकर, दिगंबर पाटील, मनीषा बेलवलकर, आदींच्या उपस्थितीत पत्र दिले. 'विवेकानंद'चे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सतीश उपळावीकर यांची निवड

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या बी. व्होक.च्या ग्राफिक डिझाइन विभागातील सहायक प्राध्यापक सतीश उपळावीकर यांची हस्तकला कारागीर कामगार कल्याण संघाच्या सातारा जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे. निवडीचे पत्र त्यांना महाराष्ट्र राज्य बुरुड संघाचे राज्य उपाध्यक्ष जयवंत सोनवले यांच्या हस्ते देण्यात आले. निवडीप्रसंगी संघाचे राजाध्यक्ष दीपक यादव, नंदकुमार बेलवलकर, जिल्हाध्यक्ष दिगंबर पाटील, महिला आघाडीच्या अध्यक्ष मनीषा बेलवलकर, सारनाथ नागवंशी यांच्या उपस्थितीत हे पत्र देण्यात आले.

# स्वच्छतेसाठी घेतली शपथ

कोल्हापूर टाइम्स टीम

महापालिकेच्यावतीने रविवारच्या स्वच्छता मोहिमेला कॉलेजियन्स व सेवाभावी संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जयंती नाला, रंकाळा तलावासह अन्य ठिकाणी राबवलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये विविध कॉलेजांतील ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहा डंपर कचऱ्याची उचल करण्यात आली. अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले.

करवीर पंचायत समिती कार्यालयात महावीर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शहर स्वच्छतेची प्रतिज्ञा घेऊन मोहिमेला सुरुवात केली. पंचगंगा नदीजवळील गायकवाड बंगल्यानजीक महापौर माधवी गवंडी व आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते स्वच्छता मोहिमेला सुरुवात झाली. सिद्धार्थ नगर, जयंती नाला, रंकाळ्यासह शहरातील नाल्यांच्या पात्राजवळ स्वच्छता केली. सकाळी पाऊस असताना एनसीसी, एनएसएस विद्यार्थ्यांसह सेवाभावी संस्थांनी स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी होत मोहिमेला बळकटी दिली. शहरातील महावीर, गोखले, केआयटी, न्यू पॉलिटेक्निक, विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेनंतर ठिकठिकाणी वृक्षारोपण केले. त्यांच्यासह स्वरा फाउंडेशन, नेशन फर्स्ट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, वृक्षप्रेमी ग्रुप, राष्ट्र प्रथम फाउंडेशन, समस्त हिंदुत्ववादी संघटना, भारतीय मजदूर संघ, संस्कार भारती, भारतीय किसान संघांचे अनेक कार्यकर्ते मोहिमेमध्ये सहभागी झाले होते.

आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, 'प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड लावून संगोपन करावे. एक ते १५ ऑगस्ट यांदरम्यान राबवण्यात येणाऱ्या स्वच्छता पंधरावड्यामध्ये सहभागी व्हावे.'

महावीर कॉलेजचे प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. उमेश बागंदरे, प्राचार्य व्ही. बी. शिंदे, गोखले कॉलेजचे प्राचार्य पी. डी. पाटील सहभागी होते.



महापालिकेने रविवारी राबवलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये शहर स्वच्छतेची प्रतिज्ञा घेताना सहभागी विद्यार्थी व कार्यकर्ते.

महाराष्ट्र टाइम्स
सोमवार, २९ जुलै २०१९

# विवेकानंद कॉलेजला आयएसओ मानांकन

कोल्हापूर : येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयास आय.एस.ओ. मानांकन प्राप्त झाले. याआधीं कॉलेजला कला, क्रीडा, सांस्कृतिक, साहित्य, संशोधन इत्यादी विविध क्षेत्रातील सहभागाची दखल घेत नॅकची ए ग्रेड मानांकन आहे. गेल्यावर्षी या महाविद्यालयास शैक्षणिक स्वायत्ततेचा दर्जा प्राप्त झालेला आहे. यापूर्वी महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावरील एनआयआरएफ रँकिंगमध्ये देशात ५८ वा क्रमांक प्राप्त केला होता. तसेच या महाविद्यालयास स्टार कॉलेज सीपीईचा दर्जाही प्राप्त झाला आहे. महाविद्यालयात पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू आहेत. या सर्व बाबींची दखल घेत आयएसओ मानांकन जाहीर केले आहे. या मानांकनाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. श्रुती जोशी, डॉ. कैलास पाटील, प्रा. समीक्षा फराकटे व प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे. MT

पुण्यनगरी

# स्वच्छता मोहिमेत सहा डंपर कचरा उठाव

## सलग चौदाव्या रविवारीही नागरिकांतून उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर /प्रतिनिधी :** महास्वच्छता अभियानात चौदाव्या रविवारी (दि. २८) महावीर कॉलेज, न्यू पॉलिटेक्निक कॉलेज, केआयटी कॉलेज, गोखले कॉलेज, विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका, वृक्षप्रेमी, अखिल भारतीय विद्यार्थी, नेचर फस्ट, जनसंयोग ग्रुप व विविध संघटनांनी सहभाग घेतला. यावेळी सहा डंपर कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले.

शहरामध्ये सुरू असलेल्या महास्वच्छता अभियानाच्या चौदाव्या रविवारीही नागरिकांतून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी सिद्धार्थनगर परिसर, करवीर पंचायत समिती कार्यालय येथे महावीर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देऊन मोहिमेस प्रारंभ झाला. यावेळी एनसीसी व एनएसएसच्या २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. तसेच महावीर उद्यान येथे गोखले कॉलेजच्या एनसीसी व एनएसएसच्या १०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी, केआयटी कॉलेजच्या २० विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली, तर संप आणि पंप हाऊस येथे विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून वृक्षारोपण केले. रिलायन्स मॉलमागे नाला परिसरात स्वरा फौंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

पंचगंगा नदीजवळ गायकवाड यांच्या बंगल्याजवळील मंदिर परिसरात महापौर माधवी गवंडी व आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या परिसरात १५० झाडे लावण्यात आली. यावेळी नगरसेवक अजित ठाणेकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष संदीप देसाई, नेशन फर्स्ट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कोल्हापूर, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, वृक्षप्रेमी ग्रुप, राष्ट्र प्रथम फौंडेशन, समस्त हिंदुत्ववादी संघटना, भारतीय मजदूर संघ, संस्कार भारती, भारतीय किसान संघ या संस्था व संघटनांचे स्वयंसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रिलायन्स मॉलमागे उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल रोहित सलवळकर यांना ५०० रुपये दंड करण्यात आला.



कोल्हापूर : महास्वच्छता अभियानाच्या चौदाव्या रविवारी सहभागी झालेले आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी. (छाया : पांडुरंग पाटील)

यावेळी अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले. नगरसेवक जय पटकारे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता रमेश मस्कर, डॉ. विजय पाटील, पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, नारायण भोसले, महावीर कॉलेजचे प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. उमेश बागंदरे, प्रा. रवींद्रपाडवी, प्रा. डॉ. गोपाळ गावडे, प्रा. जावेद मिस्त्री, न्यू पॉलटेकिनकल कॉलेजचे प्राचार्य व्ही. बी. शिंदे, संदीप घाटगे, एस. आय. शिरोळे, जगदीश इंगवले, गोखले कॉलेजचे प्राचार्य पी. डी. पाटील, प्राध्यापक ए. एन. बचाटे, बी. एस. कांबळे, ए. एन. बसुगडे, आर. एन. बिसुरे, केआयटी कॉलेजचे गुरुप्रसाद चव्हाण, शीतल वरुर, पंचगंगा घाट संवर्धन समितीचे महेश कामत, कनिष्ठ अभियंता आर. के. पाटील, महादेव फुलारी, परवाना अधीक्षक राम काटकर, दिलीप देसाई, उदय गायकवाड, अजय कोराणे, क्रिडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर व महापालिकेच्या सर्व विभागांकडील कर्मचारी, आर्ट ऑफ लिव्हिंगचे कार्यकर्ते, आरोग्य विभागाकडील ३०० कर्मचारी, अधिकारी व नागरिक यांनी सहभाग नोंदवला.

### ऑगस्टमध्ये स्वच्छता पंधरवडा : आयुक्त

या मोहिमेवेळी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, शाळा-महाविद्यालयांच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक बाटल्या, रिकामे डबे असा सुका कचरा गोळा करून एक दिवस शाळेत, कॉलेजमध्ये अथवा महापालिकेच्या वतीने १६ ठिकाणी सुरू केलेल्या संकलन केंद्रात जमा करावा. दि. १ ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा विद्यार्थ्यांनी राबवावा.

पुढारी कोल्हापूर, सोमवार, २९ जुलै २०१९

# भर पावसात स्वच्छता मोहीम

## सहा डंपर काढला गाळ; १ ऑगस्टपासून स्वच्छता पंधरवडा

कोल्हापूर : प्रतिनिधी

शहरात रविवारी भर पावसात सामाजिक संस्था, शाळा व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवित स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत सहा डंपर कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. महापौर माधवी गवंडी व आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या उपस्थित पंचगंगा घाट परिसरात १५० रोपे लावण्यात आली.

सकाळी सात वाजता चौदाव्या महास्वच्छता अभियानास सुरुवात झाली. सिद्धार्थनगर परिसर, करवीर पंचायत समिती कार्यालय येथे कॉलेजच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देऊन मोहिमेची सुरुवात झाली. विवेकानंद कॉलेज, महावीर कॉलेज, गोखले कॉलेज, केआयटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

संप आणि पंप हाऊस येथे स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. रिलायन्स मॉलच्या मागे नाल्याच्या परिसरात स्वरा फाऊंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. येथे उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल ५०० रुपये दंड करण्यात आला.



कोल्हापूर : शहरातील विविध सामाजिक संस्था व विद्यार्थ्यांनी रविवारच्या चौदाव्या महास्वच्छता अभियानात सहभाग नोंदवित सहा डंपर कचरा गोळा केला. (छाया : नाज ट्रेनर)

### स्वच्छतेची जबाबदारी घ्यावी

प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. सिद्धार्थनगर परिसरातील जयंती नाल्याच्या परिसराची स्वच्छतेची जबाबदारी महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी घ्यावी. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा मोहीम विद्यार्थ्यांनी राबवावी, असे आवाहन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले आहे.

क्रिडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अँन्ड इंजिनिअर्सचे अध्यक्ष अजय कोराणे, प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. उमेश बागंदरे, प्रा. रवींद्र पाडवी, प्रा. डॉ.गोपाळ गावडे, प्रा. जावेद मिस्त्री, प्राचार्य व्ही. बी. शिंदे, संदीप घाटगे, एस. आय. शिरोळे, जयदिश इंगवले, प्राचार्य पी. डी. पाटील, प्रा. ए. एन. बचाटे, बी. एस. कांबळे, ए. एन. बसुगडे, आर. एन. बिसुरे, गुरुप्रसाद चव्हाण, शीतल वरुर, दिलीप देसाई, उदय गायकवाड आदींसह या अभियानात विविध संघटनांनी सहभाग घेतला.

पुढारी कोल्हापूर, सोमवार, २९ जुलै २०१९

# भर पावसात स्वच्छता मोहीम

## सहा डंपर काढला गाळ; १ ऑगस्टपासून स्वच्छता पंधरवडा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शहरात रविवारी भर पावसात सामाजिक संस्था, शाळा व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवित स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत सहा डंपर कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. महापौर माधवी गवंडी व आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या उपस्थित पंचगंगा घाट परिसरात १५० रोपे लावण्यात आली.

सकाळी सात वाजता चौदाव्या महास्वच्छता अभियानास सुरुवात झाली. सिद्धार्थनगर परिसर, करवीर पंचायत समिती कार्यालय येथे कॉलेजच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देऊन मोहिमेची सुरुवात झाली. विवेकानंद कॉलेज, महावीर कॉलेज, गोखले कॉलेज, केआयटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

संप आणि पंप हाऊस येथे स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. रिलायन्स मॉलच्या मागे नाल्याच्या परिसरात स्वरा फाऊंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. येथे उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल ५०० रुपये दंड करण्यात आला.

क्रिडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अॅन्ड इंजिनिअर्सचे अध्यक्ष अजय कोराणे, प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. उमेश बागंदरे, प्रा. रवींद्र पाडवी, प्रा. डॉ.गोपाळ गावडे, प्रा. जावेद मिस्त्री, प्राचार्य व्ही. बी. शिंदे, संदीप घाटगे, एस. आय. शिरोळे, जयदिश इंगवले, प्राचार्य पी. डी. पाटील, प्रा. ए. एन. बचाटे, बी. एस. कांबळे, ए. एन. बसुगडे, आर. एन. बिसुरे, गुरुप्रसाद चव्हाण, शीतल वरुर, दिलीप देसाई, उदय गायकवाड आदींसह या अभियानात विविध संघटनांनी सहभाग घेतला.



कोल्हापूर : शहरातील विविध सामाजिक संस्था व विद्यार्थ्यांनी रविवारच्या चौदाव्या महास्वच्छता अभियानात सहभाग नोंदवित सहा डंपर कचरा गोळा केला. (छाया : नाज ट्रेनर)

### स्वच्छतेची जबाबदारी घ्यावी

प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. सिद्धार्थनगर परिसरातील जयंती नाल्याच्या परिसराची स्वच्छतेची जबाबदारी महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी घ्यावी. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा मोहीम विद्यार्थ्यांनी राबवावी, असे आवाहन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले आहे.

पुण्य नगरी
smart Kolhapur
। सोमवार, २९ जुलै २०१९ । कोल्हापूर

# बॅरिस्टर खर्डेकर उत्तुंग व्यक्तिमत्त्व

## – खा. धैर्यशील माने



कोल्हापूर : शाहू स्मारक भवन येथे बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर, निंबाळकर फौंडेशनच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या प्रा. बी. जी. मांगले, प्रा. डॉ. मनोज गुजर यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर खा. धैर्यशील माने, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संग्रामसिंह खर्डेकर, राहुलराजे खर्डेकर आदी. (छाया : पांडुरंग पाटील)

कोल्हापूर / प्रतिनिधी :

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांनी ज्ञानदानाचे कार्य करताना शिक्षण क्षेत्रात रचनात्मक काम केले. स्वतःच्या नोकरीला तिलांजली देताना शिक्षकांना न्याय मिळवून दिला. ज्ञानदान व रस्त्यावरील संघर्ष करताना कोल्हापूरचे प्रतिनिधित्वही त्यांनी केले. त्यांच्या भाषणांनी पंडित जवाहरलाल नेहरूही प्रभावित झाले. खर्डेकरांचे शिक्षण क्षेत्रातील रचनात्मक कार्य अद्वितीय होते, असे प्रतिपादन खा. धैर्यशील माने यांनी केले.

शाहू स्मारक भवन येथे बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर, निंबाळकर फौंडेशनच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या प्रा. बी. जी. मांगले, प्रा. डॉ. मनोज गुजर यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

खा. माने म्हणाले, खर्डेकरांचे व्यक्तिमत्त्व राजबिंडे असे होते. त्याचबरोबर ते ज्ञानोपासकसुद्धा होते. त्यांनी शिक्षण क्षेत्रात अविश्रांत रचनात्मक कार्य केले. राजाराम, एल्फस्टिन कॉलेजमध्ये शिक्षण घेऊन परदेशात बॅरिस्टर परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान पटकावले; पण स्वतः वकिली न करता उच्च शिक्षणात प्राध्यापक म्हणून काम केले. राजाराम कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून काम करताना दर्जेदार शिक्षणाबरोबर उत्कृष्ट प्रशासन यंत्रणा उभारली. शिक्षण प्रसाराचे व्रत हाती घेऊन आयुष्यभर काम केले.

प्राचार्य अभयकुमार साळोखे म्हणाले, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकरांसारखी माणसे होती म्हणून शिक्षणाचा पाया रचला गेला. त्यांच्या रूपाने शिक्षणाची दिशा आज आम्हाला मिळाली. त्यामुळे शिक्षण संस्थांची धुरा चांगल्या पद्धतीने आज पेलू शकलो. त्यांच्या कामाचा, कार्याचा आवाका पाहता त्यांचासारखा माणूस होणे नाही.

यावेळी प्रा. पी. जी. मांगले, प्रा. डॉ. मनोज गुजर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ. नमिता खोत, पीटर चौधारी, नुसरत शानूर मुजावर, प्राचार्य बी. टी. काटकर, संग्रामसिंह खर्डेकर, राहुलराजे खर्डेकर, रमेश भदाणे, महादेव कापूरकर, संग्रामासिंह गायकवाड आदी उपस्थित होते.

सकाळ

सोमवार,
२९ जुलै २०१९ २

# चौदाव्या रविवारी महास्वच्छतेला प्रतिसाद

## सहा डंपर कचरा जमा; विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, संघटनांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २८ : शहरात सलग चौदाव्या रविवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात महावीर कॉलेज, न्यू पॉलिटेक्निक कॉलेज, केआयटी कॉलेज, गोखले कॉलेज, विवेकानंद कॉलेजचे एन.सी.सी. व एन.एस.एस.चे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका, पर्यावरणप्रेमी, अखिल भारतीय विद्यार्थी, नेचर फस्ट, जनसंयोग ग्रुप व विविध संघटनांनी सहभाग नोंदविला. यावेळी ६ डंपर कचरा व प्लास्टिक गोळा केले.**

सिद्धार्थनगर परिसर, करवीर पंचायत समिती कार्यालयात सुरवात केली. महावीर कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभाग नोंदविला. तसेच महावीर उद्यान येथे गोखले कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे १०० विद्यार्थी-विद्यार्थिनी व के.आय.टी. कॉलेजच्या २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून स्वच्छता केली. पंप आणि पंप हाऊस येथे विवेकानंद कॉलेज, स्वरा फौंडेशनतर्फे वृक्षारोपण केले.

पंचगंगा नदीजवळ गायकवाड यांच्या बंगल्याजवळील मंदिराच्या परिसरात महापौर माधवी गवंडी व आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते वृक्षारोपण केले. या वेळी नगरसेवक अजित ठाणेकर, संदीप देसाई, नेशन फर्स्ट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, वृक्षप्रेम ग्रुप, राष्ट्र प्रथम फौंडेशन, हिंदुत्ववादी संघटना, भारतीय मजदूर संघ, संस्कार भारती, भारतीय किसान संघाचे कार्यकर्ते सहभागी झाले.



कोल्हापूर : महापालिकेतर्फे सलग चौदाव्या रविवारी स्वच्छता मोहीम राबविली.

आयुक्त डॉ. कलशेट्टी यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनी यांना स्वच्छतेची शपथ दिली. शाळेच्या, महाविद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्लॅस्टिक पिशव्या, प्लॅस्टिक बाटल्या, रिकामे डबे असा सुका कचरा गोळा करून एक दिवस शाळेत, कॉलेजमध्ये अथवा महापालिकेतर्फे १६ ठिकाणी सुरू करण्यात येणाऱ्या संकलन केंद्रात जमा करण्याचे आवाहन केले. १ ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा विद्यार्थ्यांनी राबवावा, असे आवाहन केले. रिलायन्स मॉलमागे उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल रोहित सलवळकर यांना रक्कम ५०० रुपये दंड केला.यावेळी नगरसेवक जय पटकारे, अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता रमेश मस्कर, डॉ. विजय पाटील, पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, नारायण भोसले, प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. उमेश बागंदरे, प्रा.रवींद्र पाडवी, प्रा. डॉ. गोपाळ गावडे, प्रा. जावेद मिस्त्री, प्राचार्य व्ही. बी. शिंदे, संदीप घाटगे, एस. आय. शिरोळे, जयदीश इंगवले, प्राचार्य पी. डी. पाटील, प्रा. ए. एन. बचाटे, बी. एस. कांबळे, ए. एन. बसुगडे, आर. एन. बिसुरे, गुरुप्रसाद चव्हाण, शीतल वरुर, पंचगंगा घाट संवर्धनचे महेश कामत, आर. के. पाटील, महादेव फुलारी, राम काटकर, दिलीप देसाई, उदय गायकवाड, अजय कोराणे, क्रेडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, आर्ट ऑफ लिव्हिंगसह संघटनांनी सहभाग नोंदविला.

### १ ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा

डॉ. कलशेट्टी यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनी यांना स्वच्छतेची शपथ दिली. शाळेच्या, महाविद्यालयांच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्लास्टिक, प्लास्टिक बाटल्या, रिकामे डबे असा सुका कचरा गोळा करून एक दिवस शाळेत, कॉलेजमध्ये अथवा महापालिकेतर्फे १६ ठिकाणी सुरू करण्यात येणाऱ्या संकलन केंद्रात जमा करण्याचे आवाहन केले. १ ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा विद्यार्थ्यांनी राबवावा, असे आवाहन केले.

तरुण भारत ▪ सोमवार, २९ जुलै २०१९



कोल्हापूर : गोखले कॉलेज परिसरातील हुतात्मा पार्क येथे शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शहर स्वच्छतेची शपथ देताना आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी. सोबत उपस्थित मान्यवर.

# शहर स्वच्छतेचा चौदावा रविवार

- सिद्धार्थनगर, महावीर उद्यान परिसरात मोहीम
- गायकवाड वाड्याजवळ १५० वृक्षांचे रोपण
- मोहिमेत वाढतोय लोकसहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

महापालिका आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांनी शहर स्वच्छतेचा हाती घेतलेला वसा गेल्या १४ आठवड्यांपासून अखंडित पण सुरु आहे. आजच्या चौदाव्या रविवारी शहरातील सिद्धार्थनगर, करवीर पंचायत समिती कार्यालय, महावीर उद्यान, गायकवाड वाडा, संप आणि पंप हाऊस आदी परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. मोहिमेत दिवसेंदिवस लोकसहभाग वाढत असून महावीर, गोखले, विवेकानंद, केआयटी, न्यू पॉलिटेक्निक आदी महाविद्यालयांमधील सुमारे ४०० हून अधिक विद्यार्थ्यांसह नेचर फस्ट, जनसंयोग ग्रुपच्या सदस्यांनी शहर स्वच्छतेत सहभाग नोंदवला. आयुक्तांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली.

करवीर पंचायत समिती कार्यालय परिसरात मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. यावेळी महावीर महाविद्यालयाचे २०० हून अधिक एन. सी. सी. व एन. एस. एस.चे विद्यार्थी उपस्थित होते. महावीर उद्यान येथे गोखले कॉलेजचे १०० हून अधिक आणि केआयटी कॉलेजच्या २० विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिम राबवली. यावेळी एकूण सहा डंपर कचरा व प्लॅस्टीक संकलीत करण्यात आले.

यावेळी नगरसेवक जय पटकारे, रमेश मस्कर, डॉ. विजय पाटील, समीर व्याघ्रांबरे, नारायण भोसले, प्राचार्य आर. पी. लोखंडे, न्यू पॉलिटेक्निकचे प्राचार्य व्ही. बी. शिंदे, गोखलेचे प्राचार्य पी. डी. पाटील, गुरुप्रसाद चव्हाण, शितल वरुर, महेश कामत, आर. के.पाटील, अजय कोराणे, क्रीडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर आदींसह महापालिका आरोग्य विभागाचे ३०० हून अधिक कर्मचारी सहभागी झाले होते.

### गायकवाड वाडा परिसरात १५० वृक्षांचे रोपण

पंचगंगा नदीजवळील गायकवाड वाडा परिसरात महापौर माधवी गवंडी आणि आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. परिसरात १५० वृक्षांचे रोपण झाले. यावेळी नगरसेवक अजित ठाणेकर, संदीप देसाई आदींसह विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### पाचशे रुपये दंड

रिलायन्स मॉलच्या मागील बाजूस स्वरा फौंडेशनतर्फे स्वच्छता करण्यात आली. यावेळी येथे उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल रोहित सलवळकर याला महापालिकेतर्फे ५०० रुपये दंड करण्यात आला.

THE TIMES OF INDIA, KOLHAPUR
MONDAY, JULY 29, 2019

# Vivekanand college awarded with ISO certificate

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The city-based Vivekanand college has been awarded with the ISO certificate for its academic, administrative, social, art, literature and research achievements, read a press statement from the college.

According to the statement, the National Assessment and Accreditation Council (NAAC) had awarded college with A grade last year while it has already received autonomous status from the University Grants Commission (UGC). It further added that the college was ranked 58th by the National Institutional Ranking Framework (NIRF).

**DKTE students selected for higher education in China**

Four students from the Ichalkaranji-based DKTE Society's Textile and Engineering Institute have been selected for higher education, read a press statement from the college.

The statement also added that the institute had signed a Memorandum of Understanding (MoU) with the Wuhan Textile University, China, a premier University for textile education in Asia. As part of this co-operation, the students from DKTE will pursue Master's program at Wuhan University in China and will be eligible for scholarship of Rs 25 Lakh.

CAMPUS BUZZ

Wuhan Textile University has proven significant presence in Asia in international education and recorded remarkable progress in the textile education. The students are admitted to this university on the basis of excellent academic track record.

Students from DKTE — Sammed Patil, Kuldip Chavan, Pawan Kumar and Shweta More — were selected by Wuhan University for pursuing MS programme and are eligible for scholarship.

**SUK faculty clears NET**

The faculty member of the Department of Computer Science, Parshuram Wadar of the Shivaji University, Kolhapur (SUK), has cleared the recently conducted National Eligibility Test (NET). He has already cleared the State Eligibility Test (SET).

The newly-formed National testing Agency (NTA), an autonomous organisation under the Department of Higher Education, Ministry of Human Resource Development, had conducted the NET earlier this year. The NET enables the candidates to receive Junior Research Fellowship (JRF) of the UGC and makes them eligible for being appointed as lecturer in the UGC-affiliated universities across the country.

**Nominations for reserve category to be announced today**

The Shivaji University, Kolhapur (SUK), will announce the reserve category nominations for the upcoming campus polls today. This year campus polls will be conducted after 25 years. They were earlier banned in the early 1990s.